follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।



पुण्याच्या वस्तीत हरवलेले वारसास्थळ : नागेश्वर महादेव मंदिर

RNI Regd. No. 72105/99 वर्ष २५ अंक ३१७ सातारा सोमवार दि.१९ ऑगस्ट २०२४ पाने ४ किंमत ५/- रूपये

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण लाभार्थी सन्मान सोहळा

## ५० हजार महिलांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न





**सातारा :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही अत्यंत महत्वकांक्षी व क्रांतिकारी योजना आहे. ही योजना लाडक्या बहिणींसाठी कायमस्वरुपी सुरु राहणार आहे. या आर्थिक वर्षात योजनेसाठी ३५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्याची आर्थिक स्थिती जसजशी मजबूत होत जाईल तसे सद्यस्थितीत असणारी दरमहा १ हजार ५०० रुपयांची रक्कम वाढवत जावून टप्पा-टप्प्याने ही रक्कम तीन हजार रुपयांपर्यंत करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडक्या बहीणींना दिली.

सातारा येथील सैनिक स्कूलच्या मैदनावर मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण लाभार्थी सन्मान सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्य उत्पादन तथा पालकमंत्री शंभूराज देसाई, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष महेश शिंदे, आमदार सर्वश्री. श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, मकरंद पाटील, जयकुमार गोरे, दिपक चव्हाण आदी उपस्थित होते.

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कायमस्वरुपी सुरु राहणार : -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, महिला जोपर्यंत सशक्त होत नाही तोपर्यत अर्थव्यवस्था बळकट होत नाही. महिलांना पैसे कुठे कसे खर्च करावे चांगले कळते. या योजनेमुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. यातून मिळणाऱ्या पैशाचा उपयोग करुन महिला लहान मोठे उद्योग सुरु करतील. राज्याच्या एकूण विकासाच्या दृष्टीने ही योजना महत्वपूर्ण ठरेल. त्यामुळे ही योजना कायमस्वरुपी सुरु ठेवण्यात येणार असून ती कधीही बंद पडणार नाही. दरमहा १ हजार ५०० रुपयांची रक्कम वाढत जावून टप्या-टप्यापर्यंत ३ हजार रुपयांपर्यंत करण्यात येईल. शासन बहिणींसाठी हक्काचे माहेर आहे आणि मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून मिळणारी ही ओवाळणी राज्यातील बहिणींना दरमहा मिळत राहणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी मुख्यमंत्री भावनिक होत म्हणाले, माझी ताई कष्ट करते, शेतात राबते याची आम्हांला जाणीव आहे, अशा कष्टकरी बहीणींसाठी ही योजना सुरु करण्यात आली असून आत्तापर्यंत राज्यात १ कोटी बहीणींच्या खात्यात ३ हजार कोटी रुपये जमा झाले आहेत. शासन समाजातल्या सर्व घटकांच्या विकासासाठी प्रयत्नशील आहे.

महिला बचत गट, कौशल्य विकास योजना व अन्य योजनांच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. विविध उद्योगांच्या माध्यमातून त्यांना ताकत द्यायची आहे. आमची बहीण लखपती झालेली पाहायची आहे. महिलांना आत्मनिर्भर करतानाच त्यांचा आत्मसन्मानही वाढवायचा आहे. ही योजना महिलाना आत्मनिर्भर बनविणारी योजना आहे. लाडक्या बहिणींबरोबरच शासन युवक, शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी अशा सर्वांनाच बळ देत आहे. त्यासाठी मुख्यमंत्री अन्नपूर्ण योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण योजना, मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजना, मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना या योजनांना गती देण्यात येत आहे. विविध योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शासन प्रयत्न करित आहे.

---

**महत्त्वाचे**

### या जिल्ह्यांना वादळी पावसाचा इशारा

**मुंबई :** पुढील दोन दिवस राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळ ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कोकण आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह आणि विजांच्या कडकडाटासह मध्यम पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवलीये. पाहूयात १९ ऑगस्ट रोजी विभाग वार राज्यातील हवामानाची स्थिती कशी राहील.

राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये १८ आणि १९ ऑगस्ट अशा दोन्ही दिवशी जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मुंबई शहर आणि उपनगरात पुढील २४ तासांमध्ये आकाश अंशत: ढगाळ राहून मेघगर्जनेसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. मुंबईत कमाल ३४ तर किमान २६ अंश सेल्सिअसच्या आसपास तापमान असेल. मुंबई सह कोकण विभागातील सर्व जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला असून वादळी वारा आणि मेघगर्जनी सह मध्यम पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्याला मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. उत्तर महाराष्ट्रातील नाशिक आणि जळगाव मध्ये देखील मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आलीय. तर मराठवाड्यातील जालना, छत्रपती संभाजी नगर या जिल्ह्यांना देखील हवामान विभागाने १९ ऑगस्ट रोजी मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे नागरिकांना योग्य ती काळजी घ्यावी लागणार आहे.


---

# कोल्हापुरात आढळल्या १.४० लाख कुणबी नोंदी

### तरीही दाखले घेण्यास नागरिकांची पाठ

**गारगोटी :** राज्य शासनाने मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये कुणबी नोंदी शोधण्याबाबत निर्णय घेतला. त्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्ह्यामध्येही कुणबी नोंदीच्या शाळा, शासकीय कार्यालये, महसूल दप्तर यामध्ये शोध घेतला असता १ लाख ४0 हजारांहून अधिक नोंदी सापडल्या आहेत. त्यापैकी १0 हजार नागरिकांना आजतागायत मागील १0 ते ११ महिन्यांमध्ये दाखले देण्यात आलेले आहेत. अद्यापही ९0 ते ९५ टक्के नागरिकांनी कुणबी नोंदी सापडूनही दाखले घेतलेले नाहीत, अशी माहिती समोर आली आहे.

काही उपविभागीय अधिकारी कुणबी दाखले देण्यामध्ये टाळाटाळ करत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे आमदार प्रकाश आबिटकर यांनी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्याकडे केलेल्या मागणीनुसार जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालयांकडून देण्यात आलेल्या दाखल्यांचा आढावा



घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.

यावेळी बोलताना आमदार आबिटकर म्हणाले, जिल्ह्यात मोठ्या संख्येने कुणबी नोंदी सापडल्या आहेत; परंतु, अद्यापही नागरिकांनी कुणबी दाखले घेण्यासाठी अर्ज न केल्यामुळे शासनाने मोठी मोहीम राबवूनही याचा सर्वसामान्य नागरिकांना लाभ झालेला नाही. याबाबत सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडून दाखले देण्याबाबत जुनी कार्यपद्धती अवलंबून दाखले देण्यास टाळाटाळ करण्यात येते, ही गंभीर बाब आहे.

---

# मराठा आरक्षणाबाबत संभाजी भिडेंची भूमिका स्पष्ट

**सांगली :** सध्या राज्यामध्ये मराठा आरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर आलेला आहे. मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी ओबीसीमधून संपूर्ण मराठा समाजाला आरक्षण द्यावे अशी मागणी केली आहे. तसेच निवडणूकीच्या आधी आरक्षण दिले नाही तर निवडणूका लढू असा इशारा देखील जरांगे पाटील यांनी दिला आहे. तर ओबीसी समाजाचा यासाठी विरोध आहे. यावर आता श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संस्थेचे प्रमुख संभाजी भिडे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. तसेच बांगलादेशमध्ये हिंदू लोकांवर सुरु असलेल्या अत्याचारांवर देखील संभाजी भिडे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. तसेच सांगली कडकडीत बंद ठेवणार असल्याचे देखील सांगितले आहे.

काय म्हणाले संभाजी भिडे?

शेजारील बांगलादेशमध्ये हिंदूवर अत्याचार होत आहे. याच्या निषेधार्थ संभाजी भिडे पुढे असून यासाठी त्यांनी सांगलीमध्ये बंद पुकारला आहे. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे येत्या २५ ऑगस्ट रोजी सांगलीत कडकडीत बंद ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती संभाजी भिडे यांनी दिली आहे. याबद्दल माहिती देताना संभाजी भिडे म्हणाले, बांगलादेशमधील हिंसाचाराविरोधात सांगलीत कडकडीत बंद ठेवण्यात येणार आहे. बांगलादेशमधील नंगानाच तात्काळ थांबला पाहिजे. यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घेतला पाहिजे, असे मत संभाजी भिडे यांनी व्यक्त केले आहे.

**मराठा आरक्षणाबाबत भूमिका काय?**

माध्यमांशी संवाद साधताना संभाजी भिडे यांना मराठा आरक्षणाबाबत प्रश्न विचारण्यात आला. यावर भिडे म्हणाले, मराठा आरक्षण हा कळीचा मुद्दा आहे. पण जर ट्रेनिंग कॅम्पमध्ये नि:शुल्क प्रवेश दिला तर वाघ आणि सिंहानी तिथे प्रवेश घ्यावा का? विमान उडविण्याच्या प्रशिक्षणासाठी गरुडाने प्रवेश घ्यावा का? स्विमिंग क्लबमध्ये मासळी प्रवेश घेईल का? अशाच पद्धतीने मराठ्यांनी आरक्षण मागावे का? मराठ्यांना उभा देश चालवायचा आहे. आरक्षण कुठे मागता? सिंहानी जंगल सांभाळायचे असते. मराठा जात ही संबंध देशाचा संसार चालविणारी जात आहे, हे मराठ्यांच्या ज्या दिवशी लक्षात येईल, त्यादिवशी या मातृभूमीचे भाग्य उजळून जाईल. हे त्यांच्या लक्षात येत नाही, हे आपले दुर्दैव आहे, अशी प्रतिक्रिया संभाजी भिडे यांनी दिली आहे.

---

# अजित पवार यांच्यापाठोपाठ देवेंद्र फडणवीस यांची खास ड्रेसिंग स्टाईल

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात गुलाबी बहर आल्याचे चित्र पहायला मिळत आहे. अजित पवार यांच्यापाठोपाठ फडणवीस यांनी देखील आपली ड्रेसिंग स्टाईल काहीशी बदलल्याचे दिसत आहे. अजित पवारांच्या पाठोपाठ देवेंद्र फडणवीसांनाही गुलाबी रंगाची भुरळ पडल्याचे दिसत आहे. तसा बदल देवेंद्र फडणवीस यांच्या ड्रेसिंग स्टाईलमध्ये पहायला मिळत आहे.

गुलाबी जॅकेट, गुलाबी बॅनर, गुलाबी स्टेज आणि आता गुलाबी रिक्षा... अजित पवारांच्या राष्ट्रवादीने सर्व राजकारणच गुलाबी रंगात रंगवून टाकले आहे. याच गुलाबी रंगाची भुरळ भाजपला देखील पडल्याचे दिसत आहे. मुंबईतील एका कार्यक्रमात राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अजित पवार यांच्या प्रमाणे गुलाबी जॅकेट परिधान करुन आले. देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांच्यासारखेच गुलाबी जॅकेट परिधान केले आहे. महाराष्ट्रात सुरु असलेल्या या गुलाबी राजकारणाची चांगलीच चर्चा रंगली आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणातला गुलाबी रंग हा तसा नवा नाही. केसीआर यांच्या बीआरएसने महाराष्ट्रातही गुलाबी रंगाचं वादळ आणलं होतं. परंतु ते अचानक लुप्त झालं. आता याच गुलाबी रंगाला अजित पवार यांनी आपलसं केलेय. राष्ट्रवादीचं काम करणाऱ्या एजन्सीनं हा रंग सुचवल्याचं बोललं जातंय. मात्र दादांची ही 'गुलाबी' चाल विरोधी पक्षातल्या नेत्यांसह सर्वपक्षीयांना भुरळ घालून गेलीय. याची झलक मुंबईतल्या भाजपच्या कार्यकर्मात पहायला मिळाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांच्या प्रमाणे गुलाबी जॅकेट परिधान केले आहे.

---

### कसारा घाटात भीषण अपघात

**शहापूर :** नव्या कसारा घाटात कंटेनर दरीत कोसळून भीषण अपघात झाला आहे. या अपघातात पाच जण ठार झाले असून तिघे गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. नाशिककडून मुंबईच्या दिशेने येणारा कंटेनर दरीत कोसळला. या कंटेनरमधून पाच ते सहा जण प्रवास करत होते अशी माहिती समोर येत आहे. अपघातानंतर घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन दल आणि कसारा पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. जखमींना बाहेर काढण्यात आले आहे. तर मृतदेह बाहेर काढण्याचे काम सुरू आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, शहापूर तालुक्यातील नव्या कसारा घाटात कंटेनर दरीत कोसळून दुर्घटना घडलीय. चालकाचा ताबा सुटून कंटेनर कसारा घाटात खोल दरीत कोसळला. या कंटेनरमध्ये पाच ते सहा प्रवासी होते. यातील पाच जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांची नावे अद्याप समोर आलेली नाही. तर जखमींमध्ये एका लहान मुलाचा समावेश आहे. जखमींना बाहेर काढण्यात यश आले आहे.

---

# २० ऑगस्टला मुंबईत काँग्रेसचा भव्य मेळावा

**मुंबई :** माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त २० ऑगस्टला मुंबईच्या षण्मुखानंद सभागृहात दुपारी ३ वाजता महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी व मुंबई विभागीय काँग्रेस कमिटीच्या वतीने भव्य कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्याला काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्यसभेतील विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगेजी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार, माजी मुख्यमंत्री व शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे, महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष



खासदार वर्षा गायकवाड, विधान परिषद गटनेते सतेज बंटी पाटील यांच्यासह प्रमुख नेते व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे, अशी माहिती प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे यांनी दिली आहे. दरम्यान काही दिवसापूर्वी महाविकास आघाडीचा पदाधिकारी मेळावा षण्मुखानंद सभागृहात संपन्न झाला आहे, या मेळाव्यातून महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सरकारवर जोरदार निशाणा साधला होता. आता काँग्रेसच्या मेळाव्यातून विरोधक सरकारवर टीका करण्याची शक्यता आहे.

---

# महाराष्ट्रातील ५ महिला भाविकांना उत्तराखंडमध्ये चिरडणाऱ्या टँकर चालकाला अटक

**श्रीनगर :** श्रीनगरच्या श्रीकोटमध्ये पाच महिला भाविकांना चिरडणाऱ्या टँकर चालकाला अखेर पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेत टँकर चालकानं भरधाव वेगात गाडी चालवत आधी गायीच्या वासराला धडक दिली. त्यानंतर रस्त्याच्या कडेला बसलेल्या पाच महिलांना चिरडलं.

१३ ऑगस्ट रोजी रात्री १०.३० च्या सुमारास बद्रीनाथ महामार्गावरील रामा हॉटेल श्रीकोट येथे महाराष्ट्रातील महिला भाविक हॉटेलबाहेर बसल्या होत्या. तेव्हा अनियंत्रित टँकर क्रमांक ळख १२ ण्अ ००३२ ने त्यांना चिरडलं. पाचही महिला महाराष्ट्रातील रहिवासी होत्या. त्या आपल्या कुटुंबियांसोबत उत्तराखंडच्या चार धामला भेट देण्यासाठी आल्या होत्या. परतत असताना हा भीषण अपघात झाला.

सरिता गौरी (वय ५० वर्षे) रा. अकोला आणि ललिता तौरी (वय ५० वर्षे) रा. अकोला यांचा या अपघातात मृत्यू झाला.

तर सारिका राजेश राठी (वय ४६ वर्षे) रा. अमरावती), संतोषी धनराज राठी (वय ४५ वर्षे) आणि मधुबाला राजेंद्र कुमार (वय ५४ वर्षे) रा. अकोला या महिला गंभीर जखमी झाल्या आहेत.

भीषण अपघातानंतर टँकर चालक फरार झाला होता. त्यामुळे कुटुंबीयांनी श्रीनगर पोलिस ठाण्यात टँकर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्यानंतर पोलिसांनी आरोपी चालकाविरुद्ध कलम ५४२०२४ कलम २८११२५(अ) (ब)१०६ बीएनएस आणि ११ प्राण्यांवर क्रूरता कायदा १९६० अन्वये गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला. पोलिसांनी आरोपी टँकर चालक सुभाष दरवे याला अटक केली आहे.

---

# मश्वर येथील तिघे पाण्यात बुडाले

**सातारा :** महाबळेश्वर मधील गवळी अळी येथील मुन्नवर शहाबुद्दीन नालबंद वय ३८ दिलावर शहाबुद्दीन नालबंद वय २८ हे दोन सख्खे भाऊ व रांजणवाडी मधील जाहिद जाकीर पटेल वय २८ हा युवक असे तिघे महाड तालुक्यातील सावित्री नदी किनारी असलेले सव येथील दर्गा दर्शनासह येथे असलेले गरम पाण्याचे झरे पाहण्यासाठी गेले असता सावित्री नदीत पोहायला उतरले व पाण्यामध्ये बुडाले या तिघांचा देखील मृतदेह सापडले आहेत

ावित्री नदी पात्रात पोहण्यासाठी तिघेही एकत्रित उतरले बराच वेळ झाला तरी तिघे बाहेर येत नसल्याचे पाहून मुन्नवर यांच्या पत्नी प्रचंड घाबरून रडत त्यांनी या घटनेबाबत माहिती परिसरातील नागरिकांना देत शोधण्याची विनंती केली नागरिकांनी या घटनेची माहिती महाड पोलिसांना दिली तातडीने एनडीआरएफचे बचाव पथक देखील घटनास्थळी दाखल झाले त्यांनी नदीपात्रात या तिघांचा शोध सुरु केला साडेचार वाजण्याच्या सुमारास दोघांचे तर पाच वाजण्याच्या दरम्यान तिसऱ्या युवकाचा मृतदेह बचावपथकास शोधण्यात यश आले.

---



**राखी खरेदीसाठी बहिणीनी केली स्टॉलवर गर्दी** ..सोमवारी आज साजऱ्या होणाऱ्या बहीण -भावाचे नाते दृढ करणाऱ्या राखी पौर्णिमेसाठी बहिणी भावाला राखी बांधतात .या आकर्षक राख्या खरेदीसाठी सातारा शहरातील राजवाडा परिसरातील राखी स्टॉलवर बहिणीनी रविवारी मोठी गर्दी केली होती. (छाया : अतुल देशपांडे, सातारा.)

# आज दिवस असणार खास; आकाशात दिसणार निळा चंद्र!



**मुंबई :** १९ ऑगस्ट रोजी संपूर्ण देशभर रक्षाबंधनाचा सण उत्साहात साजरा केला जाईल. योगायोगाने याच दिवशी आकाशातील चंद्रही सर्वात मोठा आणि अधिक तेजस्वी दिसणार आहे. यालाच 'सुपर ब्लू मून' असे म्हटले जाते. याला स्टर्जन मून असेही म्हटले जाते. आकाशात चंद्राचे हे मनोहारी रूप पाहणे म्हणजे सर्वांसाठी अनोखी पर्वणी ठरणार आहे.

चंद्राची पृथ्वीभोवतीची भ्रमण कक्षा लंबवर्तुळाकार असल्याने पृथ्वी व चंद्र अंतर कमी-अधिक होत असते. नेहमी हे अंतर सरासरी ३ लाख ८५ हजार किलोमीटर असते. या श्रावणी पौर्णिमेला चंद्र मकर राशीतील श्रवण या नक्षत्राजवळ रात्रभर पाहता येईल.

ब्लू मून का म्हणतात ?

'ब्लू मून'ही एक खगोलीय घटना आहे. जेव्हा एकाच महिन्यात दोन पौर्णिमा असतात तेव्हा दुसऱ्या पौर्णिमेला किंवा एका हंगामात चार पौर्णिमा असतात तेव्हा तिसऱ्या पौर्णिमेला 'ब्लू मून' असे म्हणतात. जेव्हा चंद्र त्याच्या कक्षेत पृथ्वीच्या सर्वात जवळ असतो तेव्हा त्याला 'सुपरमून' म्हणतात. या स्थितीत चंद्र सामान्य पौर्णिमेच्या चंद्रापेक्षा १४ टक्के मोठा आणि ३० टक्के अधिक तेजस्वी दिसतो. तसेच दर २.५ वर्षांनी एक कॅलेंडर वर्षात १३ वी पौर्णिमा असते. या पौर्णिमेला ब्ल्यू मून म्हटले जाते. हा दिवस येत्या १९ ऑगस्ट रोजी येत आहे. गत वर्षी ब्लू मून ३० ऑगस्ट २०२३ रोजी होता. ब्ल्यू मून दर दोन ते तीन वर्षांनी येतो. आता पुढील ब्ल्यू मून ३१ मे २०२६ रोजी होणार आहे.

किती वाजता पाहता येणार?

१९ ऑगस्टला रक्षाबंधनाच्या दिवशी संध्याकाळी ६:५६ वाजता चंद्रोदय होईल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी चंद्रास्त होईल.

रात्री ११:५५ वाजता चंद्र सर्वात मोठा आणि तेजस्वी दिसणार आहे. त्या त्या ठिकाणचे हवामान आणि दृश्यमानता यानुसार खगोलप्रेमींना चंद्राचे 'सुपर ब्लू मून' हे रूप पाहता येईल.

# वायफळेतील सिद्धेश्वर मंदीरास 'क' वर्गाचा दर्जा

## ग्रामस्थांच्या मागणीस यश : माजी खा. संजय पाटील, युवा नेते प्रभाकर पाटील यांचा पाठपुरावा

**तासगाव :** महाराष्ट्रासह कर्नाटकातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या तासगाव तालुक्यातील वायफळे येथील सिद्धेश्वर मंदीरास 'क' वर्गाचा दर्जा मिळाला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत याबाबतचा निर्णय झाला. गावातील कृष्णदेव (लाला) पाटील यांनी याबाबत माजी खासदार संजय पाटील व युवा नेते प्रभाकर पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्यामुळे ग्रामस्थांच्या मागणीला यश आले आहे. मंदीरास 'क' वर्गाचा दर्जा मिळाल्याने शासनाचा अतिरिक्त निधी मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे. त्यामुळे आगामी काळात मंदीराचा कायापालट होईल.



वायफळे येथील सिद्धेश्वराची यात्रा वर्षातून दोन वेळा भरते. दसऱ्यात व चैत्रात या यात्रा भरतात. मात्र यातील चैत्रात भरणारी यात्रा महत्वाची मानली जाते. १४२६ साली वायफळेची स्थापना झाली, असे सांगितले जाते. त्याकाळी बाभुळगाव येथून काहीजण येथे आले. त्यावेळेपासूनच या यात्रेस सुरुवात झाली. येथील सिद्धेश्वराचे मंदीर प्राचिन आहे. या मंदीरात सिद्धेश्वराबरोबर जोगेश्वरीची मूर्ती आहे. जागृत व नवसाला पावणारे देवस्थान म्हणून या मंदीराची ख्याती आहे.

येथील सिद्धेश्वराच्या यात्रांना शेकडो वर्षांची परंपरा आहे. या मंदीरात दररोज पहाटे ५.३० वाजता देवाची आरती होते. तर प्रत्येक रविवारी संध्याकाळी धूप, आरती केली जाते. त्यानंतर आरती खंडोबाकडे भेटीसाठी नेली जाते. हा मान गावातील चांभार समाजाकडे आहे. या मंदीरात सिद्धेश्वर, जोगेश्वरी या देवांबरोबरच गणपती, नागोबा, मारुती, राधा, कृष्ण या देवांच्याही मूर्ती आहेत. हा देव नवसाला पावतो, अशी ख्याती असल्याने अनेकजण यात्रेच्यावेळी मंदीरात नारळाचे तोरण बांधतात. तर बरेच लोक दंडस्थानही घालतात.

या देवाची चैत्र शुद्ध पौर्णिमा हस्त नक्षत्रावर यात्रा भरते. यात्रेदिवशी पहाटे मंदीरात देवाची आरती केली जाते. दुपारी १२.३० वाजता देवाची पालखी निघते. गुलाल, खोबऱ्याची उधळण या पालखीवर केली जाते. हजारो भाविक या पालखी सोहळ्यावेळी उपस्थित असतात. पालखी नेण्याचा मान गावातील भ. पा. मळ्यातील लोकांचा असतो. तर पालखीसमोर मोठी सासनकाठी धरण्याचा मान गावातील येसापाच्या वाड्यातील लोकांचा असतो. तर गावातील डवरी समाज हातात डवर घेऊन पालखीसमोर असतो. या समाजातील लोक रात्री पौराणिक कथा सांगून जागर घालतात. हा देव विंग (ता. कराड) येथील भाविकांचा कुळस्वामी आहे. त्यामुळे वर्षातील दोन्ही यात्रेस विंग भागातील हजारो भक्तगण वायफळे येथे हजेरी लावतात.

रम्यान, दुपारी १२.३० ला निघालेली पालखी खंडोबाच्या भेटीला जाते. ही पालखी दुपारी खंडोबाला तर रात्री कल्लेश्वराच्या मंदीरातील महादेवाला भेटण्यासाठी नेली जाते. यात्रेदरम्यान रात्री देशींग, खरशिंग (ता. कवठेमहांकाळ) येथील अनेकजण व गावातील मानकरी दिवट्या लावतात.

याशिवाय अश्विन शुद्ध प्रतिपदेच्या मुहूर्तावर मंदीरात घटस्थापना केली जाते. या घटस्थापनेच्यानिमित्ताने गावातील लोक निरंकार उपवास करतात. शिवाय दसऱ्यात होणाऱ्या यात्रेत हरी जागरदिवशी (आष्टमी) यमगरवाडी (ता. तासगाव) येथील मयाबा देवस्थानची धूप, आरती आल्यानंतर सिद्धेश्वराची पालखी मंदीरातून बाहेर पडते. यानंतर यमगरवाडी येथील भाविकांचा पालखीसमोर वडाच्या झाडाखाली गज नृत्याचा कार्यक्रम होते. त्यानंतर ही पालखी खंडोबाला भेटण्यासाठी जाते. पालखी सोहळ्यादरम्यान अखंडितपणे गुलाल व खोबऱ्याची उधळण केली जाते.

यात्रेच्या निमित्ताने गावातील रस्ते गुलालाने न्हाऊन निघतात. रस्त्याच्या दुतर्फा विविध प्रकारचे स्टॉल उभारले जातात. मंदीरावर आकर्षक विद्युत रोषणाई केली जाते. हजारो भक्तांचे श्रद्धास्थान असणाऱ्या या देवाची यात्रा शांततेत पार पडते. या देवाची पूजा, अर्चा करण्याचा मान गावातील गुरव समाजाकडे आहे.

या मंदीरास 'क' वर्गाचा दर्जा मिळावा, अशी गावकऱ्यांची मागणी होती. गावातील कृष्णदेव (लाला) पाटील यांच्या माध्यमातून माजी खासदार संजय पाटील व प्रभाकर पाटील यांच्याकडे यासाठी पाठपुरावा सुरू होता.

# २१ ऑगस्टला आझाद मैदानात दलित संघटनांचे एकता धरणे

**मुंबई :** अनुसूचित जाती, जमातींचे उप वर्गीकरण करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या वादग्रस्त निकालाच्या निषेधार्थ उत्तर भारतातील अनेक दलित संघटनांनी येत्या बुधवारी २१ ऑगस्ट रोजी ' भारत बंद ' ची हाक दिली आहे. त्याला महाराष्ट्रातील आंबेडकरवादी संघटनांनी प्रतिसाद दिला असून त्यासाठी जोरदार तयारी जिल्ह्या - जिल्ह्यात सुरू झाली आहे.

मुंबईत ' आंबेडकरवादी भारत मिशन ' तर्फे भारत बंदच्या दिवशी आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी दलित संघटनांची एक बैठक आज मुंबईतील प्रेस क्लब मध्ये आयोजित करण्यात आली होती. त्यात २१ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता आझाद मैदानात ' दलित एकता धरणे ' आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही माहिती बैठकीचे निमंत्रक दलित पँथरचे नेते सुरेश केदारे आणि ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ यांनी एका पत्रकाद्वारे दिली.

या बैठकीला रिपाइं ( सेक्युलर) चे अध्यक्ष श्यामदादा गायकवाड, बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टीचे अध्यक्ष ड. डॉ. सुरेश माने, ज्येष्ठ रिपब्लिकन नेते सयाजी वाघमारे, ज्येष्ठ पत्रकार सुनील खोब्रागडे, समाजवादी पार्टीचे राज्य महासचिव राहुल गायकवाड , ड. जयमंगल धनराज, सतीश डोंगरे, पीपल्स रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष मिलिंद सुर्वे, मुंबई प्रदेश अध्यक्ष मंगेश पगारे, दिवंगत रामविलास पासवान यांच्या दलित सेनेचे नेते रवी गरुड, सी पी आय एम एल ( लिब्रेशन) नेते श्याम गोहिल हे नेते उपस्थित होते.

मुंबईत आंबेडकरी बालेकिल्ले अशी ओळख असलेल्या वसाहतींमधील अनेक आंबेडकरवादी कार्यकर्ते या बैठकीला आवर्जुन उपस्थित होते. त्यात भगवान गरुड, भीमराव चिलगावकर, शरद कांबळे, जयवंत हिरे, संजय जगताप, सचिन गायकवाड, विनोद ढोके, दीपक चौगुले यांचा प्रामुख्याने समावेश होता.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सातारा येथील नवीन शासकीय विश्रामगृहाचे उद्घाटन



**सातारा :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सातारा येथील नवीन शासकीय विश्रामगृहाचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी नवीन शासकीय विश्रामगृह सर्व सोयी सुविधेसह सज्ज ठेवावे, असे निर्देश दिले.

सातारा येथील नवीन बांधण्यात आलेल्या शासकीय विश्रामगृहाचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री शंभूराज देसाई, आमदार सर्वश्री छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले, जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलीस अधीक्षक समीर शेख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे, कार्यकारी अभियंता श्रीपाद जाधव आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी नवीन विश्रामगृहाच्या इमारतीची पाहणी केली. ते पुढे म्हणाले सातारा शहरातील सदर बाजार येथील ही एक देखणी वास्तू निर्माण झाली आहे. या ठिकाणचा परिसर स्वच्छ ठेवावा आणि इमारतीची देखभाल योग्य करावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

असे आहे नवीन शासकीय विश्रामगृह

सातारा येथील शासकीय विश्रामगृहाचे विस्तारीकरण करण्यात आले असून या ठिकाणी नवीन विश्रामगृह बांधण्यात आले आहे. यासाठी १३ कोटी १२ लाख ७६ हजार १९४ रुपये खर्च आला. यामध्ये मल्टीपर्पज हॉल, साधारण कक्ष-५, डायनिंग व किचन, स्वागत व प्रतिक्षा कक्ष, एव्ही रुम, पैंट्री, स्टोअर रुम, व्हीव्हीआयपी सुट-१ व्हीआयपी सुट २ कॉन्फरन्स रुम व स्टोअर रुमसह आकर्षक विद्युत रचना, प्रोजेक्टर, ऑडियो व्हिडिओ सिस्टीम, अद्यावत फर्निचर, सर्व रुम मध्ये टेलिव्हिजन आदी सुविधा उपलब्ध आहेत.

# मांजरवाडी येथे बिबट्या जेरबंद



**नारायणगाव :** मांजरवाडी येथे शिंदे मळा शिवारात बबूश्या थोरात व विठ्ठल शिंदे यांच्या घराजवळ एका बिबट्या मादीला आज पहाटे पिंजऱ्यामध्ये जेरबंद करण्यात वन विभागाला यश आले आहे. येथील कोंबड्यांच्या शेडमध्ये काही दिवसांपूर्वी घुसून बिबट्याने वीस कोंबड्या ऐन श्रावण महिन्यात फस्त केल्या होत्या.

त्याच ठिकाणी यापूर्वी अनेक पाळीव प्राण्यांवरही बिबट्याने हल्ला केला होता. येथे दिनांक १७ रोजी पहाटे बिबट्याला जेरबंद करण्यात यश आले आहे. दरम्यान येथील शेतकरी रंगनाथ शिंदे, तंटामुक्तीचे अध्यक्ष मच्छिंद्र थेटे व ग्रामस्थ बबूश्या थोरात व सरपंच मनीषा मुळे यांनी बिबट्याला जेरबंद करण्यासाठी येथे पिंजरा लावण्याची मागणी केली होती या बिबट्याला जेरबंद करण्यासाठी वनरक्षक ज्ञानेश्वर पवार वन कर्मचारी खंडू भुजबळ, पोलीस पाटील सुशांत भुजबळ, सचिन टावरे, ग्राम सुरक्षा दलाचे जवान रामकृष्ण चोपडा तुषार टेके अक्षय थोरात आदित्य डेरे शंतनू डेरे यांनी विशेष परिश्रम घेतले . दरम्यान या बिबट्याला माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रात दाखल करण्यात आले आहे.

# राज्यात लाडकी बहीण योजना तर जुन्नर तालुक्यात लाडका भाऊ कार्यक्रम जोमात

**पुणे :** महाराष्ट्र राज्यामध्ये मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू झाली असताना जुन्नर तालुक्यात मात्र आज वेगळे चित्र पाहायला मिळाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जनसन्मान यात्रा नारायणगावात उत्साहात आल्यानंतर आमदार अतुल बेनके यांची शाळा असलेल्या इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्रांगणामध्ये लाडका भाऊ कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.



यावेळी हजारो महिला भगिनींनी आमदार अतुल बेनके यांना राख्या बांधल्या. उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित दादा पवार तसेच राष्ट्रवादी पक्षाचे राज्य अध्यक्ष सुनील तटकरे, राजश्री बेनके, गौरी अतुल बेनके, उज्वला शेवाळे, सुप्रिया लेंडे, डॉ पल्लवी बेनके, धनश्री बेनके, अतुल भांबेरे, तसेच राष्ट्रवादीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रक्षाबंधन / नारळी पौर्णिमा

हिंदू पंचांगाप्रमाणे श्रावणात येणारी राखी पौर्णिमा ही नारळी पौर्णिमेच्या दिवशी किंवा पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर दुसऱ्या दिवशी असणाऱ्या पौर्णिमेला साजरी करतात. याच दिवसाला'रक्षाबंधन' म्हणतात.



**नारळी पौर्णिमा**

श्रावण पौर्णिमेचा दिवस हा भारताच्या समुद्रकिनारी राहणारे प्रांत नारळी पौर्णिमा म्हणून साजरा करतात.समुद्र हे वरुणाचे स्थान समजले जाते. वरुण हा पश्चिमेचा दिक्पाल आहे. त्याला या दिवशी श्रीफळ अर्पण करून त्याच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची हिंदू प्रथा आहे. समुद्राशी एकरूप झालेल्या आणि जीवनात अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या कोळी समाजाकडून नारळी पौर्णिमेला समुद्राची पूजा केली जाते. मासेमारीसाठी सागरसंचार करणाऱ्यांनी वर्षाकालीन क्षुब्ध सागरावर जाणे थांबवलेले असते. पावसाळ्याचे सुरुवातीचे दिवस हा काळ माशांच्या प्रजननळ, म्हणून या काळात मासेमारी करत नाहीत. श्रावण पौर्णिमेस सागराला श्रीफळ अर्पण करून सागरपूजन झाले की समुद्रात होड्या नेऊन मासेमारी सुरू होते. मासेमारी करणारे कोळी वर्षानुवर्षे हा नियम कटाक्षाने पाळत आले आहेत.

**पारंपारिक नैवेद्य**

नारळी पौर्णिमेच्या निमीत्ताने बनवलेल्या खास नारळाच्या करंजांचा नैवेद्य सागराला आणि बोटीला दाखवण्यात येतो. अनेक कोळी पाडयांवर रावस माश्याचा तळलेला तुकडा देखील नैवेद्यामधे ठेवला जातो.त्यानंतर आपापल्या कोळी पाडयांवर पारंपारीक गिते गायली जातात. मिरवणुका काढल्या जातात. नारळ फोडण्याचा खेळ खेळला जातो. विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात. कोळी स्त्रिया भरजरी कपडे घालुन पारंपारीक नृत्य करतात.

राखी' ह्या शब्दातच रक्षण कर' - राख म्हणजे सांभाळ' हा संकेत आहे. कुठल्याही कर्तबगार, धाडसी शूरवीराने याचक, दुर्बल, वृद्ध, आजारी, असहाय, अपंग व अबलांचे रक्षण करणे हा धर्म आहे. हेच लक्षात घेऊन याच दिवशी रेशमी धागा अशा करारी पुरुषाच्या हाती बांधून त्याच्याकडून रक्षणाचे अभय घेण्याची ही प्रथा आहे. हे अभय शास्त्राधारे पौरोहित्य करणारे पुरोहित आपल्या यजमानघरी स्वतः सर्वांना राखीचा रेशीमधागा मंत्रोच्चारांसह बांधून देतात. यातला गर्भित अर्थ नात्याचे रक्षण करणे हाच आहे.

या दिवशी रक्षाबंधनाचा कार्यक्रम असतो. हा सण बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा दिवस आहे. श्रावण पोर्णिमेस राखी बांधावी, असे धर्मशास्त्रात म्हटले आहे.या विधीस 'पवित्रारोपण' असेही म्हणतात. भावाचा उत्कर्ष व्हावा, आपल्या भावाने आपले रक्षण करावे, ही यामागची मंगल मनोकामना असते.

उत्तर भारतात हा सण राखी म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवशी बहीण आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून भावास दीर्घ आयुष्य व सुख लाभो मिळो अशी कामना करतात. राखी बांधण्याचा अर्थ ती बांधणाऱ्या व्यक्तीच्या प्रेमरूपी बंधनात स्वतःला गुंतवून त्या व्यक्तीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारणे. राखी बांधण्याच्या या सणातून स्नेह व परस्परप्रेम वृद्धिंगत करण्याची प्रथा अस्तित्वात आली आहे. रक्षाबंधन म्हणजे हातातील राखीस साक्षी मानून आपल्या बहिणीचे सदैव रक्षण करण्याचे वचन देणे.

काही प्रांतात नोकर आपल्या मालकाला, ब्राह्मण आपल्या यजमानाला, मुलगी आपल्या वडिलांना, आणि पत्नी नवऱ्याला राखी बांधते. आपल्यापेक्षा बलवान, समर्थ माणसाला राखी बांधून आपल्या रक्षणाचे वचन घेणे हीच यामागची भावना आहे.भारतीय समाजात ऐक्य आणि प्रेमभाव वाढीस लागावा यासाठी रक्षाबंधनाचा सण राजपूत लोकांत रूढ झाला. आजकाल मात्र बहीण-भावाच्या पवित्र प्रेमाचा सण म्हणून हा सण साजरा होतो. या दिवशी बहिणी आपल्या सख्ख्या भावाच्या हातावर राखी बांधतातच आणि शिवाय त्या बंधुत्वसमान नाते असलेल्या व्यक्तीसही राखी बांधतात.

रक्षाबंधनाची सुरवात केव्हा झाली, याबद्दल निश्चित पुरावा नाही; पण त्याविषयी एक आख्यायिका आहे. पूर्वी देवदानवांच्या युद्धात दानवांच्या शक्तीपुढे देवांचे काही चालत नसे. दानवांचा राजा वृत्रासुर याने देवांचा राजा इंद्र याला युद्धाचे आव्हान दिले. इंद्र आपले वज्र घेऊन युद्धास निघाला. त्या वेळी इंद्राला विजय मिळावा म्हणून त्याची पत्नी शुची हिने विष्णूकडून मिळालेला एक दोरा (राखी) इंद्राच्या हातावर बांधला. त्या राखीच्या प्रभावाने इंद्राला त्या युद्धात विजय मिळेल, अशी तिची श्रद्धा होती. इंद्राचा विजय झाला आणि त्याचे गेलेले वैभव परत मिळाले. या प्रसंगाची आठवण म्हणून मनगटावर राखी बांधण्याची पद्धत पडली, असे सांगितले जाते.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# राज्यातील पहिले सौरग्राम मान्याचीवाडी

**सातारा :** राज्य शासनाने गेल्या अडीच वर्षात सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून वीजक्षेत्रात मोठी कामगिरी केली आहे. राज्यातील ४४ लाख शेतकऱ्यांना एप्रिलपासून पुढील पाच वर्ष मोफत वीज देण्यात येत आहे. तर मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना व मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेतून दिवसा वीजपुरवठा करण्यात येणार आहे. सोबतच केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून घरगुती वीजग्राहकांचे वीज बिलदेखील शून्यवत होत आहे. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून शेतकरी व घरगुती वीजग्राहकांना मोठा आर्थिक दिलासा देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.



पाटण तालुक्यातील (जि. सातारा) मान्याचीवाडी गावामध्ये 'महावितरण'च्या वतीने १०० टक्के सौर ऊर्जीकरण करण्यात आले आहे. राज्यातील पहिले 'सौर ग्राम' झालेल्या मान्याचीवाडीचे लोकार्पण करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. वीजक्षेत्रात राज्य शासनाने केलेल्या कामगिरीबद्दल उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांचे तसेच पहिल्या सौरग्रामचे सरपंच रवींद्र माने यांचे त्यांनी जाहीर अभिनंदन केले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री शंभूराज देसाई, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, मान्याचीवाडीचे सरपंच रवींद्र माने आणि महावितरणचे संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, सातारा जिल्ह्यातील मान्याचीवाडी गावाने राज्यात पहिले सौरग्राम होण्याचा मान मिळवला आहे. या गावातील प्रत्येक नागरिकाचे मी अभिनंदन करतो. सौर ऊर्जा ही प्रामुख्याने घरगुती ग्राहक व शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पाद्वारे घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य होत आहे. तसेच राज्य शासनाने मागेल त्यांना सौर कृषिपंप योजना जाहीर केली असून खुल्या प्रवर्गातील शेतकऱ्यांना १० टक्के रक्कम तर अनुसूचित जाती, जमातीच्या शेतकऱ्यांना पाच टक्के रक्कम भरून साडेसात अश्वशक्तीपर्यत कृषिपंप व सौर पॅनेल्स मिळणार आहे. उर्वरित रक्कम राज्य शासन अनुदानातून देणार असल्याची माहिती मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिली.

उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतून घरगुती ग्राहकांना मोफत वीज उपलब्ध होत आहे. तर येत्या दीड वर्षामध्ये राज्यात सौर ऊर्जे द्वारे १२ हजार मेगावॅट वीजेची निर्मिती होणार आहे. ही वीज शेतकऱ्यांना दिवसा देण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी रात्री शेतात जाण्याची गरज राहणार नाही. राज्याने सौर ऊर्जेमध्ये मोठी आघाडी घेतली आहे. राज्यात पहिले सौर ग्राम म्हणून मान्याचीवाडीचे आज लोकार्पण झाले याचा आनंद आहे. या गावात पूर्वी ५ लाख २५ हजार रुपयांचे वीजबिल येत होते. ते सौर ग्राममुळे शून्य झाले आहे. आता राज्यातील १०० गावे १०० टक्के सौर ऊर्जेवर नेण्याची मोहीम सुरु असून त्यासाठी गावांची निवड झाल्याचे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार महेश शिंदे, आमदार जयकुमार गोरे, महावितरणचे कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंता अंकुश नाळे यांची उपस्थिती होती.

## मेघ गर्जनेसह मुसळधार पाऊस

**कोरेगाव :** कोरेगाव तालुक्यात सलग चार दिवस जोरदार पडणाऱ्या पावसाने जीवनमान ठप्प झाल्याची अवस्था असून, दुपारच्या सुमारास वीज, मेघ गर्जनेसह मुसळधार पाऊसाने जोरदार हजेरी लावल्याने बहुसंख्य गावातील ओढे, नाल्यांना पूर आला. देऊर ते वाठार स्टे. मार्गावर रेल्वे गेट नजीक ट्रक बंद पडल्याने तब्बल दीड तास वाहतूक ठप्प, मुसळधार पडलेल्या पावसामुळे बहुसंख्य शेतकऱ्यांच्या शेत मालासह शेतातील माती वाहून गेली असून शेत पिकात पाणी साठवून राहिल्याने लाखो रुपयांचे नुकसान मुसळधार पावसामुळे शेत बांध फुटून माती वाहून गेली तर शेत पिकांना तळ्याचे स्वरूप आले आहे. शिरंबे व रहिमतपूर महसूल मंडलात पडलेल्या मुसळधार पावसामुळे कमंडलू नदीसह अनेक ओढ्या नाल्यांना पूर आला होता. रहीमतपूरचा आज आठवडा बाजार, श्रावण महिना सुरू असल्याने बाजारपेठेत पंचक्रोशीतील महिला नागरिक यांची तुडुंब गर्दी होती. दुपारच्या सुमारास अचानक विजांच्या कडकडाटात मुसळधार पावसाने सुरुवात केली, नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या विजांच्या जोरदार आवाजामुळे बहुसंख्य नागरिकांनी भीती पेक्षा दक्षक्ता घेत मोबाईल स्वीच ऑफ केले होते.

# सातारा नगरपालिका करतेय स्वत:च स्वत:ची वीज तयार

### अपारंपरिक ऊर्जेला प्राधान्य : चार ठिकाणी १५० किलोवॅटचा सोलर प्रकल्प

**सातारा :** शहर विकासाच्या विविध योजना राबवत असताना सातारा पालिकेने आता अपारंपरिक ऊर्जा साधनांचा वापर करत वीजनिर्मितीकडे पाऊल टाकले आहे. पालिकेने 'माझी वसुंधरा अभियान ३.0' अंतर्गत शहरात चार ठिकाणी १५० किलोवॅट क्षमतेचे सोलर प्रकल्प कार्यान्वित करण्याचे काम हाती घेतले आहे. आतापर्यंत हे काम ७५ टक्के पूर्ण झाले असून, या प्रकल्पांमुळे पालिकेच्या वीजबिलात वार्षिक नऊ लाखांची बचतही होणार आहे.

सद्यस्थितीत वीजनिर्मिती करण्यासाठी आवश्यक असलेले कोळसा, तेल आदी पारंपरिक इंधनसाठे दिवसेंदिवस कमी होत चालले आहेत तर विजेची मागणी मात्र वाढत चालली आहे. त्यामुळे केंद्र व राज्य शासनाने पारंपरिक ऊर्जा साधनांचा कमीत कमी वापर करून अपारंपरिक ऊर्जा साधनांचा वापर वाढावा, यासाठी कृषी सौर वाहिनी, पीएम सूर्यघर अशा योजना हाती घेतल्या आहेत. पीएम सूर्यघर योजनेंतर्गत जिल्ह्यातील ५०५ नागरिक स्वत:च स्वत:ची वीज तयार करू लागले आहेत. आता सातारा पालिकेनेही 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करून वीजबिल शून्य करण्याकडे एक पाऊल टाकले आहे.

रंगकर्मींच्या हक्काचे ठिकाण असलेले श्री शाहू कलामंदिर, सांबरवाडी येथील जलशुद्धीकरण केंद्र व हुतात्मा उद्यान येथे सोलर यंत्रणा बसविण्यात आली आहे. तर गोडोलीतील आयुर्वेदिक गार्डनमध्ये ही यंत्रणा बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. प्रत्येक ठिकाणी विजेच्या गरजेनुसार सोलर संच बसविण्यात आले असून, येत्या काही दिवसांत प्रत्यक्षात वीजनिर्मिती सुरू होणार आहे. असा प्रकल्प राबविणारी सातारा ही जिल्ह्यातील एकमेव पालिका आहे.

या ठिकाणी तयार होणार वीज

ठिकाण - प्रकल्पाची क्षमता (किलोवॅट)

१. शाहू कला मंदिर - ८० किलोवॅट

२. सांबरवाडी - ३० किलोवॅट

३. हुतात्मा उद्यान - २० किलोवॅट

४. आयुर्वेदिक गार्डन - २० किलोवॅट

वार्षिक ९ लाखांची बचत

सातारा पालिकेला शाहू कला मंदिर, सांबरवाडी जलशुद्धीकरण केंद्र, हुतात्मा उद्यान व आयुर्वेदिक गार्डन या चार ठिकाणांचे मिळून महिन्याला सरासरी ७५ हजार रुपये वीजबिल येत आहे. वीजनिर्मिती प्रकल्पामुळे या चारही ठिकाणचे वीजबिल शून्य होणार असून, पालिकेची वर्षाला सुमारे ९ लाख रुपयांची बचतही होणार आहे.

## क्राईम

### ग्रेड सेपरेटरमधील मारहाण प्रकरणी सहा जणांवर गुन्हा

**सातारा :** ग्रेड सेपरेटरमध्ये एका अल्पवयीन मुलास मारहाण केल्याप्रकरणी सहा जणांविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १२ रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास वाय सी कॉलेज समोर असणाऱ्या ग्रेड सेपरेटरमध्ये साहिल प्रवीण साबळे रा. शिवथर, ता. सातारा या विद्यार्थ्यास हत्यार व लाथा बुक्क्यांनी मार केल्याप्रकरणी साहिल इनामदार व त्याच्या सोबत असलेल्या पाच अनोळखी इसमांवर (पूर्ण नाव पत्ता माहीत नाही) सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास महिला पोलीस नाईक बोराटे करीत आहेत.

### युवती बेपत्ता

**सातारा :** सातारा शहर परिसरातून एक २२ वर्षीय युवती बेपत्ता झाल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ११ रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास सातारा शहरानजीक असलेल्या संगम माहुली परिसरातील राहत्या घरातून एक २२ वर्षीय युवती निघून गेल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. अधिक तपास महिला पोलीस नाईक कदम करीत आहेत.

### सातारा बस स्थानकातून मंगळसूत्राची चोरी

**सातारा :** सातारा बस स्थानकातून अज्ञात चोरट्याने मंगळसूत्राची चोरी केल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १० रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास साधना बाळकृष्ण चव्हाण रा. नेर, ता. खटाव जि. सातारा या सातारा बस स्थानकात बस मधून खाली उतरत असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समधील ४५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेले आहे. अधिक तपास महिला पोलीस हवालदार सपकाळ करीत आहेत.

### मोबाईल स्नॅचिंग प्रकरणी तीन अज्ञातांवर गुन्हा

**सातारा :** जबरदस्तीने मोबाईल फोन हिसकावून नेल्याप्रकरणी तीन अज्ञातांविरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ११ रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास राधिका चौक ते कोटेश्वर मंदिर जाणाऱ्या रस्त्यावर कोमल धनाजी माने सध्या रा. शाहूपुरी, सातारा यांच्या मैत्रिणीचा मोबाईल फोन दुचाकीवरून आलेल्या अज्ञात तीन चोरट्यांनी हिसकावून जबरदस्तीने चोरून नेला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार घोडके करीत आहेत.

### शाहूपुरी पोलिसांकडून ८ लाख ८० हजारचा मुद्देमाल मूळ मालकाला परत

**सातारा :** शाहूपुरी पोलिसांनी घरफोडीमध्ये चोरी झालेले १५ तोळे वजनाचे दागिने आणि ९६ हजार रुपये रोख असा ८ लाख ८० हजार सातशे पन्नास रुपयाचा मुद्देमाल मूळ मालकास परत मिळवून दिला आहे या धडक कारवाई बद्दल पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी शाहूपुरी पोलिसांच्या अभिनंदन केले आहे

दिनांक २६ मे २०१९ रोजी राजकुमार रामचंद्र उधानी राहणार लोखंडे कॉलनी शुक्रवार पेठ यांच्या घरी झाली होती .या घरफोडीत १५ तोळे वजनाचे दागिने ९६ हजार रुपये रोख रक्कम चोरी करण्यात आली होती. शाहूपुरी पोलिसांनी या गुन्ह्याची नोंद करून तपासाला सुरुवात केली. अवघ्या २४ तासाच्या आत घरफोडीतील आरोपीला अटक करून त्याच्याकडून १५ तोळे वजनाचे दागिने आणि ९६ हजार रुपये रोख असा ८ लाख ८० हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला होता

हे सोन्याचे दागिने व रोख रक्कम मंगळवारी पोलिस अधीक्षक समीर शेख यांच्या हस्ते मूळ मालकाला परत देण्यात आले .यावेळी अपर पोलीस अधीक्षक ऑंचल दलाल व उपाधीक्षक राजीव नवले यावेळी उपस्थित होते.



**बावधन :** येथे नुकतेच प्रणित पाटील युवा मंचने बावधन मधील सर्वसामान्य ग्रामस्थांना लाभ होण्याच्या दृष्टीने मोफत नेत्र तपासणी, मोफत चष्मे

# प्रणित पाटील युवा मंचचे लोकसेवेचे काम कौतुकास्पद : मिलिंद पाटील

वाटप व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आयोजित केलेले होते.

यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी पाटील बोलत होते.कार्यक्रमास किसनवीरचे संचालक दिलीपराव पिसाळ, खरेदी विक्री अध्यक्ष मदन भोसले, सयाजीराव पिसाळ, तानाजी कचरे, माजी संचालक अंकुश कुंभार, अशोक भोसले, केंद्रीय दिशा समिती सदस्य श्री.सतेष कांबळे ,सरपंच सौ. शुभांगी कांबळे, उपसरपंच उदयसिंह पिसाळ, मराठा महासंघाचे अध्यक्ष विक्रम वाघ,भैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अजित पिसाळ, चंद्रकांत भोसले वहिवाटदार, यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

ते पुढे म्हणाले, प्रणित पाटील युवा मंच यांनी बावधन गावामध्ये सर्वसामान्य ग्रामस्थांना अतिशय आवश्यक असणारे लोकहिताचे काम केले असून हा आदर्श सर्व नविन कार्यकर्त्यांनी घ्यावा. प्रणित पाटील युवा मंचने स्वीकारलेला हा समाजसेवेचा वसा कायम ठेवावा, या मंचच्या आगामी सर्व समाजोपयोगी कार्यास माझा पाठिंबा राहील अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

या नेत्र चिकित्सा शिबिरात एकूण १४८४ रुग्णांची नेत्र तपासणी करून १०९० ग्रामस्थांना मोफत चष्मा वाटप करण्यात आले. तसेच १९० ग्रामस्थांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पुणे येथील एच व्ही. देसाई हॉस्पिटल पुणे येथे पाठविण्यात येणार आहे. या कार्यक्रमास महिलांची उपस्थिती लक्षणीय होती

# पत्नीशी प्रेमसंबंधाच्या संशयावरुन खून, तिघांना अटक

**सांगली :** कासेगाव (ता. वाळवा) येथील खासगी सावकार पांडूरंग सिद (वय ४३) याचा खून प्रेम संबंधाच्या संशयावरुन सहा लाखाची सुपारी देऊन झाल्याचे तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणी पोलीसांनी तिघांना अटक केल्याची माहिती जनसंपर्क विभागाकडून रविवारी सायंकाळी देण्यात आली. सिद यांचा खून गोळ्या झाडून करण्यात आला होता.

या खून प्रकरणी विशाल जयवंत भोसले (वय २५, रा. कामेरी ता. वाळवा), शिवाजी भिमराव भुसाळे (वय ३७, रा.मुळ गाव उमरगा, सध्या रा. महादेवनगर, इस्लामपूर) आणि सुरेश नारायण ताटे (वय ४५ रा.लोणारगल्ली, इस्लामपूर) या तिघांना अटक करण्यात आली आहे. शुक्रवार दि.१६ रोजी कासेगाव वाटेगाव शिवेच्या रस्त्याकडेला पांडुरंग भगवान शिद (वय ४३, रा कासेगाव) यांचा बंदुकीतून गोळ्या झाडून खून करण्या आला होता. यामुळे वाळवा तालुक्यात खळबळ माजली. संशयिताबाबत कोणताही पुरावा घटनास्थळी नव्हता, अथवा माहिती नव्हती.

# श्री बालाजी केमिकल कंपनीच्या नवीन तंत्रज्ञान पर्यावरण पूरक : नामदार महेश शिंदे

**कोरेगाव ;** कोरेगाव मतदार संघाचा विकास करताना या ठिकाणी उद्योग उभारणी करावी असं स्वप्न आम्ही दोघांनी पाहिले आहे. आतापर्यंत सात हजार लोकांना रोजगार दिला. आता श्री बालाजी केमिकल च्या माध्यमातून श्री रमेश उबाळे यांनी दर्जेदार बांधकाम साहित्य व रोजगार उपलब्ध करण्यासाठी तसेच पर्यावरण पूरक काम हाती घेतले आहे. त्यामुळे माझ्या नेहमीच या प्रकल्पाला शुभेच्छा राहतील. असे प्रतिपादन कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष नामदार महेश शिंदे यांनी ल्हासुर्णे ता. कोरेगाव येथे झालेल्या श्री बालाजी केमिकल कंपनीच्या प्रकल्पाच्या उभारणी निमित्त केले.

या विधायक उपक्रमाने खऱ्या अर्थाने समाजकारण व राजकारणातून आता उद्योग व्यवसायातील उत्पादन क्षमता वाढवणारे प्रकल्प राबवून राबविण्यात आल्याबद्दल उद्योजक श्री रमेश अनिल उबाळे यांच्यावर मान्यवरांनी कौतुकाचा वर्षाव केला. प्रारंभ फटाक्याची आतिषबाजी व विधी पूर्वक पूजाअर्चा केल्यानंतर श्री बालाजी केमिकल कंपनीच्या प्रकल्पाच्या उभारणीचा उद्धाघाटन कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष नामदार महेश शिंदे यांच्या हस्ते झाले.

यावेळी मार्गदर्शन करताना नामदार शिंदे म्हणाले, उबाळे कुटुबियाचे संबंध खूप जवळचे आहेत. आज चांगले व्हिजन सुरू करून बांधकाम क्षेत्रात बदल घडत आहेत. नवीन तंत्रज्ञान विकसित होत असून त्या प्रकल्पाची उभारणी श्री रमेश उबाळे यांनी केलेली आहे. पूर्वी मातीच्या विटा होत्या. आता दर्जे दार व हलक्या दर्जाच्या विटांमुळे बांधकामाचे आयुष्यमान वाढलेले आहे. त्यामुळे ग्राहक वर्गाने सुद्धा नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून या श्री बालाजी केमिकल कंपनीच्या दर्जेदार व गुणवत्ताधारक उत्पादनातूनच आपले प्रकल्प उभे करावे. असे त्यांनी आवाहन केले.

उद्योजक श्री रमेश उबाळे यांनी आभार मानताना सांगितले की खऱ्या अर्थाने ब्रह्म- विष्णू- महेश असे जे त्रिदेव आहेत. त्याप्रमाणे माझ्या दृष्टीने माझे बंधू तथा मार्गदर्शक नामदार महेश शिंदे, राहुल बर्गे व निलेश नलवडे यांनी नेहमीच मला सहकार्य केलेले आहे. मतभेद जिवंतपणाची लक्षणे असतात. त्यामुळे मतभेदाचे विसर्जन करून आमदार महेश शिंदे यांनी मिठी मारले आणि त्या मतभेदाचा विषय संपलेला आहे. आता त्यांच्यासोबत राहून त्यांच्या मार्गदर्शनाखाली किमान कोरेगाव मतदार संघात लाखभर रोजगार निर्माण करण्याचा नामदार महेश शिंदे पॅटर्न राबवण्याचा हा शुभारंभ आहे. असे त्यांनी स्पष्ट केले.

# नोकर भरती सातारा जिल्हा बँकेची पण परीक्षा होतीय संचालकांची

**सातारा :** सहकारी बँकिंग क्षेत्रामध्ये अभूतपूर्व असे १०८ पुरस्कार प्राप्त सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या लिपिक व शिपाई पदाची नोकर भरती सुरू झालेली आहे. आर्थिक दृष्ट्या सक्षम असलेल्या जिल्हा बँकेच्या सेवेसाठी सध्या मोठ्या प्रमाणात ६0 शिपाई व २६३ लिपिक पदासाठी भरती होत आहे. या दोन्ही भरतीसाठी किमान ४0 हजार अर्ज येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नोकर भरती सातारा जिल्हा बँकेची पण काही संचालकांना नाहक परीक्षा द्यावी लागत असल्याचे चित्र निर्माण झालेले आहे.



सातारा जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अर्थवाहिनी म्हणून सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे पाहिले जाते. या बँकेचे चेअरमन नितीन लक्ष्मणराव जाधव पाटील व व्हाईस चेअरमन अनिल शिवाजीराव देसाई आणि विकास सेवा सोसायटीतून निवडून आलेले तसेच खरेदी विक्री संघ कृषी उत्पादन प्रक्रिया सहकारी संस्था नागरिक बँक नागरी पतपेढी गृहनिर्माण सहकारी संस्था दूध उत्पादक संस्था अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रतिनिधी इतर मागास प्रवर्ग व विमुक्त जाती भटक्या जमाती विशेष मागास प्रवर्ग महिला प्रतिनिधी कार्य लक्ष संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर राजेंद्र सरकाळे यांच्यासह विशेष निमंत्रित सदस्य आणि प्रमुख वरिष्ठ अधिकारी अशा सर्वांच्या विचार विनिमयाने ही नोकर भरती पारदर्शक होत आहे. सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेची नोकर भरती ही नेहमीच चर्चेचा विषय ठरलेले आहे. कारण, संचालकांच्या मर्जीनुसार यापूर्वी अनेकांची भरती झाली होती. आता मात्र वाढती बेरोजगारी व प्रत्येकांना नोकरीची अपेक्षा यामुळे आता जिल्हा बँकेची नोकर भरती ही स्पर्धा परीक्षेतूनच निवडली गेली जाणार आहे. तरीसुद्धा काहींना संचालकांच्या हाती ही निवड प्रक्रिया होणार असल्याचे मानण्यात येत आहे. त्यामुळे अनेक संचालकांच्या घरी भेटणाऱ्यांची दररोजची संख्या १00ते १५0 पर्यंत वाढलेली आहे. त्यांचा चहापान करताना काही संचालकांना फुकटचे दुखणे सहन करावे लागत आहे. प्रत्येकाच्या गाठीभेटी व समस्या ऐकण्याबरोबरच जिल्हा बँकेच्या नोकर भरती बाबतही खुलेपणाने चर्चा होऊ लागलेली आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या काही संचालकांना चांगलीच परीक्षा द्यावी लागत आहे. आपल्या भागातील कुणी नाराज होऊ नये. प्रत्येकाचे समाधान करण्यासाठी जिल्हा बँकेच्या संचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. एखाद्या सार्वजनिक कार्यक्रमाला गेल्यानंतर जिल्हा बँकेच्या संचालकांना अनेकांच्या गाठीभेटी घ्याव्या लागत आहे. इथूनच मग जिल्हा बँकेच्या नोकर भरती मध्ये आपल्यावर कृपादृष्टी असावी असाही प्रयत्न केला जात आहे. मुळातच जिल्हा बँकेची भरती प्रक्रिया ही एका खाजगी एजन्सीकडे देण्यात आलेली आहे. या ठिकाणी उत्तर पत्रिका प्रत्येक उमेदवाराच्या खात्यावर दिसणार आहे. त्यामुळे कुठेही कॉपी करणे अथवा पार्सिलिटी करणे जमणार नाही. हे त्रिवार सत्य आहे.

काही स्पर्धा परीक्षेमध्ये पहिले ५0 प्रश्न व त्याचे उत्तर ही सम किंवा विषम प्रमाणात दिली जातात. त्याकडे लक्ष केंद्रित करून काही उमेदवारांना याची यापूर्वी माहिती मिळत असल्याने लेखी परीक्षेत त्यांना चांगले गुण मिळतात. याचाही अनुभव काहींनी सांगितलेला आहे. यामध्ये सत्य असले तरी स्पर्धा परीक्षेला संचालक बोर्डासाठी दहा गुण असून त्यापैकी पाच गुण हे शैक्षणिक गुणवत्तेसाठी आहेत. तर इतर पाच गुण संचालकांच्या म्हणण्यानुसार देण्यात येणार आहे. तरीसुद्धा एकूणच परीक्षेचे गुण व संचालकांच्या हाती असलेले गुण यामुळे काहींची गुणवत्ता कमी किंवा वाढली जाणार आहे .

त्यामध्ये फारसं परिणामकारक निकाल लागू शकत नाही. ही नोकर भरती एजन्सी व काही जबाबदार संचालकाच्या निगराणीखाली होत असल्याने अनेक इच्छुक उमेदवार व त्यांचे पालक हे संचालकांच्या गाठीभेटी घेऊन आपल्या पाल्याचे नशीब आजमावत आहेत. त्यामुळे आता संचालकांच्या मोबाईलवर पूर्वी पाच-पन्नास जण संपर्क ठेवत होते. आता तो आकडा अडीचशे ते तीनशे वर गेल्यामुळे संचालकांच्या मोबाईलची बॅटरी दुपारपर्यंतच कमी होऊ लागलेली आहे. असं काही संचालकांनी पत्रकारांशी औपचारिक गप्पा मारताना सांगितले .

# अजित पवारांना भाजपने दाखवले काळे झेंडे

## प्रकाश आंबेडकरांनी सांगितले मोठे राजकारण;

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवारांची जनसन्मान यात्रा जुन्नर विधानसभेत पोहचली असता भाजपच्या जुन्नर विधानसभा प्रमुख आशा बुचके काळी साडी परिधान करून रस्त्यावर उतरल्या आणि त्यांनी थेट अजित पवारांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवले. यामुळे महायुतीत मिठाचा खडा पडल्याचे चित्र आहे. आता यावरून वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मोठे राजकारण सांगितले आहे.



आज जुन्नरमध्ये पर्यटन विषयाची शासकीय बैठक पार पडत असताना आम्हाला का डावलण्यात आले? महायुती आहे तर मग मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे फोटो बैठकीत का नाहीत? पालकमंत्री म्हणून फक्त अजित पवारांचा फोटो का लावण्यात आला? या जुन्नर विधानसभेत नेमकं काय शिजतंय? असे अनेक प्रश्न उपस्थित करत बुचकेंनी पालकमंत्री अजित पवारांना धारेवर धरलं. यावरून प्रकाश आंबेडकर यांनी महत्त्वाचे भाष्य केले आहे.

प्रकाश आंबेडकरांनी सांगितलं मोठं राजकारण

प्रकाश आंबेडकर म्हणाले की, येणाऱ्या काळात काही मोठ्या घडामोडी होणार आहेत. त्यासाठी जनतेने तयार राहावे, असे म्हणत भविष्यात मोठे राजकीय घडामोडींचे सुतोवाच त्यांनी केले आहे. ते अकोला येथे धनगर समाजाच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमानंतर माध्यमांशी संवाद साधताना बोलत होते.

...तर १९९० च्या आधीची परिस्थिती येईल

गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमात बोलताना प्रकाश आंबेडकरांनी धनगर समाजाला राजकीय आवाहन केलंय. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत आरक्षणवाद्यांना मतदान करा. टाळ कुटणाऱ्यांना मतदान केलं तर १९९० च्या आधीची परिस्थिती येईल, असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकरांनी दिलाय. येणाऱ्या विधानसभेत आरक्षणाला धोका आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत आरक्षणाची शिडी वाचवायची की नाही? याचा विचार धनगर समाजाने करावा, असा त्यांनी यावेळी म्हटले.

सरकारला पोलिसांचं मनोबल तोडायचे आहे का?

दरम्यान, मराठा आरक्षणावर संभाजी भिडेंनी केलेल्या वक्तव्यावर काहीही बोलायला आंबेडकरांनी नकार दिला. तर भाजप आमदार नितेश राणे यांनी पोलिसांबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यांवर बोलताना त्यांनी सरकारवर टीका केली. नितेश राणेंच्या माध्यमातून सरकारला पोलिसांचे मनोबल तोडायचं आहे का?, असा सवाल प्रकाश आंबेडकरांनी उपस्थित केला आहे.

# विणकरांना शासकीय नोंदणीतून मिळणार नवीन ओळख व योजनांचा लाभ : मंत्री छगन भुजबळ

**नाशिक :** येवला शहरात विणकर सर्वेक्षणास सुरुवात झाली असून या सर्वेक्षणातून विणकरांची शासकीय नोंदणीद्वारे ओळखपत्र प्राप्त होणार असून याद्वारे सर्व घटकांतील विणकारांना शासकीय योजनांचा लाभ मिळणार आहे. हे सर्वेक्षण करताना यातून कोणीही वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी अशा सूचना अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिल्या.

आज येवला शहरात विणकर सर्वेक्षणबाबत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी यावेळी राजेश भांडगे, पप्पू सस्कर, मनोज दिवटे, शंभाशेठ लक्कडकोट, मयूर मेघराज, मकरंद सोनवणे, प्रवीण पहिलवान, अविनाश कुक्कर, केशव भांडगे, रमेश भावसार, गोविंदसा वाडेकर यांच्यासह विणकर बांधव उपस्थित होते.



मंत्री छगन भुजबळ यावेळी म्हणाले, राज्यात शेती व्यवसायानंतर विणकर व्यवसाय हा दुसऱ्या स्थानावर आहे. येवल्यातील विणकरांच्या सर्वेक्षणास ८ ऑगस्ट २०२४ पासून सुरुवात झाली आहे. या सर्वेक्षणातून सर्व विणकर बांधवांची नोंदणी होणार असून शासकीय ओळखपत्र मिळणार आहे. आजपर्यत तालुक्यातील ३० ते ४० गावांतून जवळपास ३ हजार विणकरांची नोंदणी सर्वेक्षणातून झाली आहे. आजपासून येवला शहरातील विणकारांच्या नोंदणीला सुरुवात करण्यात आली आहे.सुरुवातीला एका पथकाच्या मार्फत नोंदणी चालू होती मात्र गणेशोत्सवाच्या आत नोंदणी होऊन विणकारांना लाभ मिळावा यासाठी वस्त्रोद्योग आयुक्तांसोबत संपर्क साधून पाच पथकांमार्फत हे सर्वेक्षणाचे काम सुरू केले असल्याचे त्यांनी सांगितले.

येवल्यातील अनेक विणकर बांधवांकडे केंद्र शासनाचे ओळखपत्र नसल्याने त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही. मंत्री छगन भुजबळ यांनी विणकर बांधवांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी त्यांची नोंदणी होऊन त्यांना ओळखपत्र मिळण्यासाठी राज्याचे वस्त्रउद्योग मंत्री चंद्रकांत पाटील यांचेसोबत चर्चा केली होती तर वस्त्रउद्योग आयुक्तांना येवल्यातील विणकरांची नोंदणी आणि ओळखपत्राबाबत सूचना केल्या होत्या.त्यानुसार विणकर बांधवांच्या सर्वेक्षणासाठी सुरुवात करण्यात आली आहे. तसेच याबाबतचा शासन निर्णय जारी झाला असल्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी यावेळी सांगितले.

या सर्वेक्षणात विणकाम व्यतिरिक्त पैठणी साडी तयार करण्यासाठी मदतनीस म्हणून काम करतात त्यात रेशीम कळ्या उखलन्याचे काम करणारे कारागीर,कांड्या, काकडे भरणारे, चिवट्या करणारे, सांधणी करणारे, रंगणी करणारे व त्या कामात मदत करणारे कारागीर या सर्वांची नोंदणी होऊन त्यांना देखील विणकर ओळख मिळणार आहे. वस्त्रोद्योग विभागाकडे सुरू करण्यात आलेले विणकर सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर या विणकर बांधवांना शासकीय ओळखपत्र देण्यात येणार आहे. त्यानंतर विणकर बांधवांना सर्व शासकीय योजनांचा लाभ मिळणार आहे. यामध्ये २०० युनिट पर्यत मोफत वीज, उत्सव भत्ता, रेशीम खरेदीवर १५ टक्के राज्य सरकार व १५ टक्के केंद्र सरकारकडून सूट यासह विविध शासकीय योजनांचा लाभ मिळणार आहे.

लाडक्या बहिणींनी मंत्री छगन भुजबळ यांना बांधल्या राख्या

महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली आहे. या रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर या योजनेचा पहिले दोन महिन्यांचे तीन हजार रुपये महिलांच्या खात्यात वर्ग करण्यात आले आहे. या योजनेच्या माध्यमातून येवला मतदारसंघांतील सुमारे ५३ हजार महिलांना लाभ मिळाला आहे. आज येवला दौऱ्यावर असताना विणकर सर्वेक्षण कार्यक्रम प्रसंगी महिलांनी मंत्री छगन भुजबळ यांना राखी बांधत आभार मानले.

### शरद पवार-सुनीता केजरीवाल यांची पुण्यात भेट

**पुणे :** दिल्लीचे मुख्यमंत्री, आम आमदी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल यांनी पुण्यात रविवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष, माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांची भेट घेतली. केजरीवाल यांच्यासह आम आमदी पक्षाचे खासदार संजय सिंह उपस्थित होती. पवार आणि केजरीवाल यांच्यात बंद दरवाजाआड अर्धा तास चर्चा झाली. दरम्यान, ही भेट खासगी होती, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला.

मार्केटयार्ड परिसरातील निसर्ग मंगल कार्यालायत सायंकाळी ही भेट झाली. पवार यांना भेटण्यासाठी सुनीता केजरीवाल आणि खासदार संजय सिंह दिल्लीवरून पुण्यात आले. या भेटीनंतर केजरीवाल यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. तसेच शरद पवार यांनीही या भेटीबाबत कोणतेही भाष्य केले नाही.



# पीकविमा ठरतोय मृगजळ

**म्हाकवे :** रुपयात पीकविमा उतरवला; पण पूर ओसरून दहा दिवस उलटले तरीही पूरबाधित पिकांचे पंचनामे करण्यासाठी अधिकारी फिरकलेच नाहीत. त्यामुळे पूरबाधित शेतकऱ्यांसह अतिवृष्टीमुळे नुकसान झालेलेशेतकरीविवंचनेत सापडलेले आहेत. विमा कंपन्यांकडून पंचनामे कधी होणार असा सवाल उपस्थित होत आहे, तर वर्षे उलटले तरीही अद्याप गतवर्षी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई मिळालेली नाही. याबाबत संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. शेतकऱ्यांनी आपल्या पिकाचा विमा उतरवून पीक संरक्षित करावे. यासाठी गत वर्षांपासून शासनाने एक रुपयात पीकविमा योजना लागू केली. यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पीकविमा उतरवला. परंतु, गेल्यावर्षी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अद्यापही भरपाईची रक्कम मिळालेली नाही.

यंदा तर कागल तालुक्यातील वेदगंगा व दुधगंगा नदीकाठावरील शेकडो एकरातील उसासह भात, सोयाबीन, भुईमूग पिके कुजून गेली आहेत. यंदा तब्बल १८ दिवसांहून अधिक काळ पिके पाण्याखाली राहिली आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.दरम्यान, दहा-पंधरा दिवसांनंतर पूरबाधित पिके पुन्हा थोडी फार हिरवी दिसू शकतील, मात्र पुरामुळे ते अशक्त झाल्याने उत्पादकता कमी होणार आहे.

भरपाई मिळणार तरी कधी?

२०२३ खरीप हंगामात रामचंद्र दत्तू गोते (आनूर क्षेत्र अंदाजे ६० गुंठे), सुभाष भाऊ चौगुले (आनूर क्षेत्र अंदाजे ८४ गुंठे),लक्ष्मीबाई बाळाराम पाटील (म्हाकवे ३० गुंठे) यांनी गतवर्षी पीकविमा उतरवला होता; परंतु, नुकसान होऊनही भरपाई मिळाली नसल्याचे त्यांनी सांगितले.कागलमधील चार टक्केचशेतकरीचपात्रगत २०२३ खरीप हंगामात कागलमधील १५७० शेतकऱ्यांनी २८९९ विमा अर्ज दाखल केल्याने ९१३ हेक्टर क्षेत्र संरक्षित झाले होते. मात्र, केवळ ६० म्हणजे अवघ्या चार टक्के शेतकऱ्यांनाच पीकविमा परतावा मंजूर झाला आहे. अद्याप या शेतकऱ्यांच्या हातात भरपाईची रक्कम आलेली नाहीच तर उर्वरित शेतकरी भरपाईसाठी पात्र होण्याच्या प्रतीक्षेत आहेत.

यंदाच्या २०२४ खरीप हंगामात २१७० शेतकऱ्यांनी पीकविम्यासाठी ५०४५ अर्ज दाखल करून एक हजार ३१५ हेक्टर क्षेत्र संरक्षित केले आहे, तर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष ८-१० दिवसापूर्वीच शेतावर जाऊन नुकसानीची ऑनलाइन तक्रार दाखल केली.



# शाहू कारखान्याच्या मॅटवरील कुस्ती स्पर्धेत बाल गटात उच्चांकी २२१ मल्लांचा सहभाग

**कोल्हापूर :** कागलमधील छत्रपती शाहू साखर कारखान्यामार्फत आयोजित मॅटवरील कुस्ती स्पर्धेत पहिल्या दिवशी बाल गटात उच्चांकी २२१ मल्लांनी सहभाग घेतला होता.

या कुस्ती स्पर्धेचं उद्घाटन शाहू ग्रुपचे अध्यक्ष राजे समरजितसिंह घाटगे यांच्या हस्ते झालं. यावेळी शाहू साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अमरसिंह घोरपडे, सर्व संचालक,कार्यकारी संचालक जितेंद्र चव्हाण यांच्यासह कुस्ती शौकीन मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

या स्पर्धेत सायली दंडवते आणि सुकन्या मिठारी यांनी ७६ किलो वजन गटात, तर ४० किलो वजन गटात अमृता धनगर, प्रणिती साठे, वेदिका पाटील आणि अदिती कापडे यांनी अंतिम फेरीत प्रवेश केलाय. स्पर्धेचे संपुर्ण नियोजन ऑलिम्पिक पद्धतीनं केलं आहे.

पंच म्हणून बटू जाधव,संभाजी पाटील, बाळासो मेटकर,नामदेव बल्लाळ, रवींद्र पाटील, प्रकाश खोत, के.बी.चौगुले, बापू लोखंडे, सुरेश लंबे,सुरज मगदूम आदी काम पाहत आहेत.

# कामाठीपुराचा कायापालट होणार! म्हाडा ३९ एकरात ५८ आणि ७८ मजली इमारती

**मुंबई :** कामाठीपुरा येथील कुप्रसिद्ध रस्त्यांच्या जागी लवकरच उंच इमारती दिसू लागतील. या प्रकल्पाला राज्य सरकारची मंजुरी मिळाली असून सुमारे ३९ एकरांवर पसरलेल्या कामाठीपुराच्या पुनर्विकासाचा आराखडा महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरणाने (म्हाडा) काही दिवसांपूर्वी सरकारला पाठवला होता. शासनाकडून आराखड्याला मंजुरी मिळाल्यानंतर म्हाडा आता काही दिवसांत या प्रकल्पाचे काम सुरू करणार आहे. लवकरच निविदा काढल्या जातील. त्यानंतर तीन ते चार महिन्यांत प्रकल्पाचे काम सुरू करण्याचे नियोजन आहे.

म्हाडाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, या प्रकल्पातून म्हाडाला सुमारे १५०० ते १८०० फ्लॅट्स विक्रीसाठी मिळतील. त्यांच्या विक्रीतून म्हाडाला १,००० कोटींहून अधिक उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे. अशा परिस्थितीत हा प्रकल्प सुरू केल्याने सर्वसामान्यांचे घरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी म्हाडाला जमीन मिळणार आहे. त्यामुळे म्हाडाला १५०० ते १८०० फ्लॅट एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. कामाठीपुरा पुनर्विकास योजनेंतर्गत सरकारने दोन प्रकारच्या इमारती बांधण्याचे नियोजन केले आहे. कॅम्पसमध्ये सुविधांसह एकूण १८ इमारती बांधण्याची योजना आहे. यामध्ये ५८ मजल्यांच्या १० इमारती, तर ७८ मजल्यांच्या ८ इमारती बांधल्या जाणार आहेत. प्रकल्पासाठी खर्च केलेली रक्कम ८७८ मजली इमारतींमधून वसूल केली जाणार आहे. म्हाडा ७८ मजली इमारतींमधील सदनिका विकणार आहे. ५८ मजल्यांच्या १० इमारतींमध्ये स्थानिक लोकांची वस्ती करण्यात येणार आहे.

३९ एकरच्या या संकुलात सुमारे ४७५ उपकर इमारती, १६३ इतर इमारती, १५ धार्मिक स्थळे, २ शाळा आणि ४ सरकारी कार्यालये आहेत. संकुलातील सुमारे ५२ इमारती कोसळल्या आहेत. या सर्वांचा



बंदोबस्त करण्याची जबाबदारी म्हाडाची आहे. पुनर्विकास प्रकल्पांतर्गत, तेथे राहणाऱ्या सर्व पात्र नागरिकांना किमान ५०० चौरस फुटांचे घर मोफत देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. या योजनेंतर्गत ५० मीटरपर्यंतच्या जमीन मालकांना ५०० चौरस फुटांचे घर, ५१ मीटर ते १०० मीटरपर्यंतच्या जमीन मालकांना ५०० चौरस फुटांची २ घरे, १०१ मीटर ते १५० मीटरपर्यंतच्या जमीन मालकांना ३ घरे दिली जाणार आहेत.

# कोलकाता घटनेनंतर गृहमंत्रालयाचा मोठा निर्णय

**कोलकाता :** केंद्रीय गृहमंत्रालय आणि अमित शहा यांनी स्वतः कोलकाता येथील एका डॉक्टरच्या लैंगिक अत्याचार आणि हत्याप्रकरणाचासीबीआय तपास आणि आरजी कार हॉस्पिटलशी संबंधित प्रत्येक लहान-मोठ्या घटना आणि देशभरात सुरू असलेल्या निदर्शने यांच्यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी घेतली आहे. आरजी कार हॉस्पिटलमध्ये झालेल्या प्रकरणानंतर पोलिसांवर उठलेले प्रश्न आणि हायकोर्टाच्या प्रतिकूल प्रतिक्रियांनंतर गृह मंत्रालयाने मोठा निर्णय घेतला आहे. एमएचएने सर्व राज्यांच्या पोलिस दलांना कायदा आणि सुव्यवस्थेच्या स्थितीचा अहवाल 'दर दोन तासांनी' देण्याचे निर्देश दिले आहेत.

राज्यांमधील वाढत्या गुन्हेगारी लक्षात घेता, गृह मंत्रालयाने हा निर्णय घेतला आहे आणि सर्व राज्ये/केंद्रशासित प्रदेशांना आदेश जारी केले आहेत. कोलकाता बलात्कार आणि हत्येनंतर गृह मंत्रालयाने भारतातील सर्व पोलीस दलांना अधिसूचना जारी केली आहे. या सरकारी आदेशात, सर्व राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमध्ये सुरू असलेल्या निदर्शनांदरम्यान, त्यांना त्यांच्या ठिकाणच्या कायदा आणि सुव्यवस्थेचा अहवाल दर दोन तासांनी केंद्राला ईमेल/फॅक्स/व्हॉट्सपद्वारे पाठवण्यास सांगण्यात आले आहे. सुरक्षा व्यवस्थेवर लक्ष ठेवण्यासाठी आणि परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊ नये यासाठी गृहमंत्री अमित शाह यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मृत महिला डॉक्टरच्या शवविच्छेदन अहवालातून हत्येचे प्रकार आणि लैंगिक अत्याचार उघड झाल्याने देशभरात संताप व्यक्त होत आहे.

# खासदार विशाल पाटलांचा उद्धव ठाकरेंना दे धक्का



**सांगली :** लोकसभा निवडणुकीत सांगलीच्या जागेवरूनकाँग्रेसआणिउद्धव ठाकरेयांच्यात प्रचंड टोकाचा वाद झाला होता. ठाकरेंनी हट्टाने सांगलीची जागाकाँग्रेसकडूनआपल्याकडे घेतली आणि त्याठिकाणी चंद्रहार पाटील यांना उमेदवारी दिली. मात्र ठाकरेंच्या उमेदवाराविरोधात काँग्रेस नेतेविशाल पाटीलयांनी बंडखोरी करत अपक्ष निवडणुकीला सामोरे गेले. या निवडणुकीत विशाल पाटलांनी दणदणीत विजय मिळवला. आता याच विजयात हातभार लावणाऱ्यांनाविशाल पाटीलमदत करणार आहेत. त्यात खानापूर मतदारसंघात सुहार बाबर यांच्या पाठिशी असल्याचं खासदार विशाल पाटील यांनी जाहीर केले आहे.खासदार विशाल पाटील म्हणाले की, मतांच्या स्वरुपात लाखांच्या आकड्यात सुहास बाबर यांना पाठिंबा मिळावा. आम्ही अपक्ष आहोत, कुणाला घाबरत नाही. आम्हाला कुणी बोलायचे कारण नाही. जिथं आमच्यावर प्रेम दिसतंय तिथे आम्हाला प्रेम द्यायचे कळतंय. त्यामुळे आम्ही ताकदीनं तुमच्या पाठिशी राहणार यात शंका नाही असं त्यांनी जाहीर भूमिका मांडली त्यामुळे लोकसभेनंतर आता विधानसभेलाही विशाल पाटलांनी ठाकरे गटाशी भिडण्याचं ठरवलं आहे. तर सगळ्यांमध्ये ताळमेळ असणं गरजेचा आहे. महाविकास आघाडीचे जे घटक आहेत आम्हाला भाजपाप्रणित महाराष्ट्रद्वेष्टे सरकार आहे ते घालवण्याचं काम आपल्याला करायचं आहे असं सांगत आदित्य ठाकरेंनी विशाल पाटलांच्या भूमिकेवर प्रतिक्रिया दिली आहे.सुहास बाबर महायुतीचे संभाव्य उमेदवारखानापूर आटपाडी मतदारसंघात मागील निवडणुकीत शिवसेनेकडून अनिल बाबर निवडून आले होते. अनिल बाबर यांच्या रुपाने शिवसेनेने पश्चिम महाराष्ट्रातील या जागेवर भगवा झेंडा फडकवला. मात्र एकनाथ शिंदेंनी घेतलेल्या भूमिकेनंतर अनिल बाबर हे शिंदेसोबत गेले होते. अनिल बाबर यांच्या अकाली निधनामुळे खानापूर आटपाडी मतदारसंघात यंदाच्या निवडणुकीत कोण उभं राहणार अशी चर्चा आहे. त्यात अनिल बाबर यांचे पुत्र जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुहास बाबर हे एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे संभाव्य उमेदवार असतील असं बोललं जाते. त्यात महाविकास आघाडीत ही जागाउद्धव ठाकरेंच्यावाट्याला जाण्याची शक्यता आहे. त्यात खासदार विशाल पाटलांनी पुन्हा एकदा उद्धव ठाकरे गटाला दणका दिला आहे.

# बिस्किट खाल्ल्याने संभाजीनगरमध्ये १८१ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना विषबाधा

**छत्रपती संभाजीनगर :** पैठण तालुक्यातील केकत जळगाव जिल्हा परिषद शाळेमधील सुमारे १८१ हून अधिक विद्यार्थ्यांना बिस्किटातून विषबाधा झाल्याचा प्रकार समोर आला आहे. बिस्किट खाल्ल्यानंतर विद्यार्थ्यांना मळमळ, उलट्यांचा त्रास होऊ लागल्यानंतर पाचोडच्या ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलंय. या प्रकारामुळे पालक संतप्त झाले आहेत. यातील काही विद्यार्थ्यांची प्रकृती नाजूक असून त्यांना छत्रपती संभाजी नगर येथील शासकीय ग्रामीण रुग्णालय येथे दाखल करण्यात आले आहे.

पैठण तालुक्यातील केकत जळगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना बिस्किट वाटप करण्यात आले होते. हे बिस्किट खाल्ल्यानंतर विद्यार्थ्यांचे पोट दुखू लागले. काही जणांना मळमळ, उलट्या होऊन सुमारे २९३ विद्यार्थ्यांपैकी १८१ विद्यार्थी तापाने फणफणल्याचा प्रकार लक्षात आल्यावर या सर्व विद्यार्थ्यांना पाचोडच्या ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. काहींना सलाइन लावण्यात आले आहेत. सर्व मुलांचे उपचार सुरु असून, या १० मुलांची प्रकृती नाजूक असून त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करु उपचार सुरू आहे.

बिस्किटांची तपासणी करण्याची मागणी

विषबाधा झालेले सर्व विद्यार्थी सातवीच्या वर्गातील आहेत. या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या पोषण आहाराचा भाग म्हणून शनिवारी बिस्किटं देण्यात आली. ती खाल्ल्यानंतर विद्यार्थ्यांना उलट्या होऊ लागल्या, तर काहींना चक्कर येऊ लागली. शालेय पोषण आहारात दिल्या जाणाऱ्या बिस्किटांची अन्न आणि औषध प्रशासनाकडून सखोल चौकशी करण्याची मागणी विद्यार्थ्यांच्या पालकांनी केली आहे. वाटप करण्यात आलेल्या बिस्किटांची मुदत संपायला अजून दोन महिने बाकी होते. ती बिस्किटं आम्ही स्वतः खाल्ली आणि नंतर ती विद्यार्थ्यांना वाटली. विद्यार्थ्यांची प्रकृती अचानक कशी बिघडली हे आम्हालाही कळलं नाही, अशी माहिती प्राचार्य भागवत शिंदे यांनी दिली. त्याचबरोबर शाळेत वाटण्यात आलेल्या बिस्किटांचा नमुना घेऊन तपासणीसाठी पाठवू. त्यानंतर पुढील कारवाई केली जाईल, अशी माहिती शाळा समितीचे अध्यक्ष अशोक बढे यांनी दिली.